


दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**



● वर्ष : ०२ ● अंक : १३५ ● पुणे ● सोमवार, दि. ०७ एप्रिल २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

शब्दांकन : **लक्ष्मण साबळे**





## धायरीच्या सर्वांगीण विकासासाठी धावणारे नेतृत्व

# ● बाप्पूसाहेब पोकळे पाटील

## "प्रामाणिक काम विकासावर ठाम" म्हणत बाप्पुसाहेंबाचे धायरी व परिसराच्या विकासासाठी प्रयत्न...





### * वाढदिवस अभिष्टचिंतन विशेष *

धायरी आरंभपर्व : धायरी भागाच्या सर्वांनी विकासासाठी प्रयत्न करणारे जिद्दी नेतृत्व म्हणून सामाजिक कार्यकर्ते श्री .बापूसाहेब पोकळे पाटील यांची ओळख आहे.

कोणतेही पद नसतानाही जनतेसाठी त्यांनी केलेले अविरत कार्य जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी एक पाऊल ठेवले आहे.

आज त्यांच्या वाढदिवसाच्या अभिष्टचिंतना निमित्त दैनिक आरंभपर्वने घेतलेला हा आढावा...

प्रामाणिक काम विकासावर ठाम ह्या ब्रीद वाक्य घेऊन समाजकारणात सक्रिय झालेल

श्री.बापूसाहेब बाबासाहेब पोकळे धायरी गावातील एक लढवय्या सामाजिक कार्यकर्ता... युवा उद्योजक, युवा नेतृत्व..

ते पुणे महानगरपालिकेचे भावी नगरसेवक म्हणून त्यांची सर्वत्र चर्चा होत आहे.

धायरी व परिसरातील समस्यांना वाचा फोडण्यासाठी सामाजिक चळवळीमध्ये सहकार्य सहभाग त्यांनी नोंदवला आहे..

जनतेसाठी आपण काहीतरी देणे लागतो ह्या कर्तव्यापोटी अतिशय गौरवास्पद काम त्यांनी केले आहे.

शिवकालीन पाटीलकीपासून राजकीय वारसा

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात यांच्या काळात मुलखी पाटीलकी चालत आली होती . त्यावेळी त्यांचे पणजोबा आजोबा पाटील होते.

त्यांच्या घराण्याला फार पूर्वीपासून राजकीय सामाजिक वारसा आहे.

त्यांचे वडील व वडील चुलते सामाजिक कामात अग्रेसर आहेत.

एकंदरीत राजकीय वारसा असलेल्या ह्या पोकळे पाटील कुटुंबाचा वारसा बाप्पुसाहेब पुढे नेत आहेत.

## नागरिकांसाठी विविध सामाजिक उपक्रम

मागील अनेक वर्षांपासून देवदर्शन यात्रा , माता-भगिनींसाठी लहान मुलांसाठी करमणुकीचे खेळ म्हणून बाळ गोपाळांसाठी जत्रा तसेच वॉटर पार्क चे आयोजन करण्यात आले.भव्य रक्तदान शिबिर ,आरोग्य शिबिर, नेत्र तपासणी शिबिर, कोरोनामध्येही त्यांनी प्रभावी काम केले..सिल्वर बर्च चे हॉस्पिटलच्या माध्यमातूनही त्यांनी सहकार्य केले..या भागातील कुस्ती स्पर्धा ,कबड्डी स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा यांनाही ते सहकार्य करत असतात.

## धायरी ,नऱ्हेत टँकरने पाणी पुरवठा

बापूसाहेब पोकळे यांच्या माध्यमातून गेली पाच वर्ष मोफत टँकरची सेवा चालू असते .आत्तापर्यंत पंधरा ते सोळा हजार टँकर मोफत धायरी गाव , नऱ्हेगाव या ठिकाणी दिले आहेत.अतिशय खूप महत्त्वाचा मुद्दा असलेला पाणीपुरवठा विषय नकळतपणे ते सोडवत असल्याचे दिसून येते.

## सोसायटी यांच्या सुविधासाठी ही प्रयत्न

धायरी व भागातील विविध सोसायटी यांना आमदार फंडातून असो व मनपा यांना पाठपुरावा करून अनेक लोकहिताची कामे करून घेत असतात. त्यामध्ये रस्ता ड्रेनेज पाणी लाईट व इतर आरोग्य सुविधेसाठी. पाठपुरावा करून कामे पूर्ण करून घेत असतात . त्याचबरोबर त्यांना हिंदुत्वाचाही चेहरा म्हणून ओळखले जाते . धार्मिक कार्यक्रम ही मोठ्या प्रमाणात त्यांच्याकडून घेतले जातात रामनवमी, जगन्नाथ रथ यात्रा व गावातील प्रत्येक धार्मिक कार्यक्रमात त्यांचा व त्यांच्या परिवाराचा सहभाग असतो.केवळ प्रभागातील नव्हे तर खडकवासला मतदारसंघातील ही इतर भागातील जनतेसाठी अविरतपणे त्यांनी प्रयत्न केले आहेत.

## बापूसाहेब पोकळे म्हणजे कामाची हमी

ह्या भागातील नागरिकांचा "प्रश्न कोणताही असो एक कॉल प्रॉब्लेम सॉल"या पद्धतीने बापूसाहेब पोकळे यांनी काम केल्यामुळे जनतेमध्ये त्यांचे विषयी विशेष आकर्षण आहे. नकाम करण्याची पद्धती त्यांची वेगळी आहे. ह्या कामाबरोबर सक्षमपणे पाठपुरावा ही त्यांची खासियत आहे. त्यामुळे त्यांच्याकडून काम होते यावर परिसरातील जनतेचाही चांगला प्रतिसाद त्यांना मिळतो आहे.गेली दशकभराहून अधिक काळ सामाजिक कार्यासाठी झटणाऱ्या बापूसाहेबांना आगामी काळामध्ये नगरसेवक पदाची संधी चालून आली आहे अशीही जनतेमध्ये त्यांची चर्चा सुरू आहे.

**आमदार भीमराव अण्णा तापकीर, पुणे महानगरपालिका यांच्यामार्फत विविध रस्ते व विविध कामासाठी त्यांनी प्रयत्न केले. अजूनही त्यांचा पाठपुरावा अजूनही सुरूच आहे.**

**अतिशय नम्रशील असणाऱ्या या नेतृत्वाकडे धायरी भाग व परिसरातील नागरिकांची ओढ लक्षात घेता आगामी काळामध्ये त्यांच्याकडे "नगरसेवक"म्हणूनच पाहिले जात आहे..**

**वाढदिवसाच्या निमित्त बोलताना त्यांनी जनतेसाठी कार्य करायचे जनतेसाठी धावायचं , दुसऱ्याच्या चेहऱ्यावर आनंद पाहणे हेच खरे कर्तव्य असल्याचे सांगितले.**

**आगामी काळामध्ये धायरी व परिसराच्या विकासासाठी याही पुढे कटिबद्ध राहील अशी ग्वाही त्यांनी दिली आहे..**

**बाप्पूसाहेब पोकळे यांची ही भरीव कामगिरी लक्षात घेता एक काम करणारा लोकसेवक हा त्यांच्यामध्ये दिसून येतो.**

**आगामी काळात पुणे महानगरपालिकेच्या रणधुमाळी मध्ये उतरून नगरसेवक म्हणून जनतेचे प्रश्न मांडतील अशीही नागरिकांना**

## भाजप पक्ष संघटनेमध्ये ही योगदान

देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस , केंद्रीय मंत्री मुरलीधर अण्णा मोहोळ,खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या नेतृत्वाखालीम खडकवासला विधानसभा भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे यांचे अविरतपणे कार्य सुरू आहे.."खडकवासला भाजपा सरचिटणीस" म्हणून त्यांनी अत्यंत प्रभावीपणे काम केल्यामुळे खडकवासला मतदारसंघांमध्ये ही त्यांची उल्लेखनीय कामगिरी झाली आहे. नुकत्याच भाजपच्या संघटन पर्व या सभासद नोंदणी मध्ये त्यांनी एक हजार सभासद जोडले आहेत. लोकसभा असो वा खडकवासला विधानसभा प्रत्येक निवडणुकीमध्ये त्यांनी पक्षाचे काम प्रभावीपणे काम केले आहे.



## बाप्पूसाहेबांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा.



# बेस्ट उपक्रमाची व्यथा

मुंबईची दुसरी लाईफ लाईन समजली जाणाऱ्या बेस्टला आज गरज फक्त पैशांची नसून मानसिक आधाराची सुद्धा आहे. कोणे एकेकाळी सुवर्ण काळ अनुभवलेल्या बेस्टची आज अवस्था जीर्ण झाली आहे. नवीन कर्मचाऱ्यांची भरती नाही, आहे त्या कर्मचाऱ्यांवर कामाचा वाढता ताण, खासगीकरणाचा प्रचंड रेटा त्यात वातावरणही बिघडलेले. येणाऱ्या ३० तारखेला पगार होईल की नाही याची शाश्वती नाही त्यामुळे भविष्यही अंधकारमय अशीच अशा स्थितीत बेस्ट कर्मचारी आला दिवस ढकलायचे काम करत आहेत त्यामुळे त्यांच्याकडून एक कामाचा पॉझिटिव्हनेस दिसत नाही. नियमित कर्मचाऱ्यांचीही व अधिकाऱ्यांचीही ढकलगाडी सुरू आहे मग असे कर्मचारी व अधिकारी आउटपूट तरी काय देणार?

आज बेस्टही मोठ्या आर्थिक समस्यांनाच नव्हे, तर इतर अनेक समस्यांना तोंड देत आहे. त्यात बेस्टच्या कर्मचाऱ्यांची संख्या आज मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे, त्यामुळे असलेल्या कर्मचाऱ्यांवर मोठा ताण पडत आहे. एकीकडे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना आपल्याच निवृत्ती वेतनासाठी न्यायालयाचे दरवाजे ठोठावे लागत आहेत न्यायालयाने आदेश दिल्यानंतरच त्यांची देणी मिळत आहेत त्यामुळे त्यांच्या भविष्यातील आर्थिक बाबी यावर मर्यादा येत आहेत सध्या बेस्टमध्ये खासगीकरणाचे वारे जोरदार वाहू लागले आहेत.

कंत्राटदाराच्या बस गाड्या दर आठवड्याला ताफ्यात समाविष्ट होत आहेत. त्यातून स्वतःच्या बस गाड्या ताफ्याबाहेर गेल्याने मोठ्या प्रमाणावर बस चालक रिक्त होत आहेत मग त्यांना बसून तरी राहावे लागत आहे किंवा आगारातील अथवा इतर कामे करावी लागत आहेत. त्यात बस चालवण्याशिवाय इतर कोणत्याही गोष्ट येत नसल्याने इतर कामे अंगवळणी पडण्यास वेळ लागत आहे. त्यात बस चालकांनी बस वाहकाची कामे करावीत असा फतवा बेस्टने काढल्यामुळे मान्यताप्राप्त बेस्ट कामगार संघटना न्यायालयात जाऊन अशा बेस्टच्या बेकायदेशीर कृतीवर स्थगिती आणली आहे. त्यामुळे एकतर आगारात त्यांना बसावे लागते किंवा इतर गोष्टी कराव्या लागत आहेत.




त्यामुळे नैराश्याचे प्रमाण कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अशातच बस वाहकांना मात्र स्वेच्छा निवृत्ती घेता येत नाही कारण आजही बस वाहकाचे काम हे बेस्टच्या कर्मचाऱ्यांकडूनच करून घेतले जात आहे व भविष्यातही काही प्रमाणात करून घेतले जाणार त्यामुळे बस वाहकांची गरज पडत असल्याने बसवाहकांना आजही साधी सुट्टी मिळण्यात ही अनंत अडचणी येत आहेत.

चालू आर्थिक वर्षात बेस्टचा एकूण खर्च ४ हजार ५१८.३४ करोड आहे तर बस प्रवाशांकडून मिळणारे उत्पन्न हे २ हजार १६०.११ करोड रुपये अंदाजित केले आहेत. म्हणजे एकूण उत्पन्नाच्या फक्त ४७ ते ४८ टक्केच बेस्टला उत्पन्न मिळत आहे. ही उत्पन्नातील तफावत पालिकेने भरून द्यावे अशी बेस्टची अपेक्षा आहे. मात्र पालिका ती रक्कम एक रकमी ना देता १०० किंवा १०० च्या हप्त्यात देते त्यामुळे बेस्टवर खूप मर्यादा येत आहेत. आज बेस्टवरील कर्जाचा डोंगर दहा हजार ते बारा हजार करोडच्यावर गेलेला आहे त्यामुळे जर एक रकमी निदान तीन ते चार हजारांची रक्कम बेस्टला मिळाली, तर बेस्टवरचा बोजा खूप मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. निवृत्ती वेतनांची देणे दिली जाऊ शकतात तसेच इतरही देणे दिली तर बेस्टला काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो मात्र काही कारणांसाठी घेतलेले कर्ज व त्यावर देण्यात येणाऱ्या व्याजावरच पालिकेने दिलेली आर्थिक मदत ही संपून जाते त्यामुळे पुन्हा काही महिन्यांनंतर बेस्ट समोर आर्थिक समस्या आ वासून उभी राहते. त्यात सध्या बेस्टला कायमस्वरूपी महाव्यवस्थापकही मिळत नाही. मिळतात ते फक्त तात्पुरते मलमपट्टी करणारे त्यामुळे आजही बेस्टमध्ये आत्मियतेने काम करणारा महाव्यवस्थापक आवश्यक आहे. एकीकडे मुंबईत असंख्य मोठमोठे प्रकल्प आणले जात आहेत त्यात पॉड टॅक्सी असो जलवाहतूक असो मेट्रो असो त्यासाठी केंद्र व राज्य सरकार मोठमोठी रक्कम उपलब्ध करून देत आहे, मात्र बेस्टकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष तर होत नाही ना? का इतर महागड्या पर्याय निर्माण करून सर्वसामान्यांचा स्वस्त्यातील प्रवास तर हिरावून घेतला जाणार नाही ना अशी शंकाही वारंवार प्रवाशांमध्ये उपस्थित होत आहे.

सध्या बेस्टकडे स्वतःचे ६ हजार ३३७ बस चालक व ७ हजार ७२४ बस वाहक आहेत. तर कंत्राटदाराकडे ५ हजार ५०० बस चालक व २ हजार २०० बस वाहक आहेत. मात्र कायमस्वरूपी बसचालकांना मिळणारे वेतन व कंत्राटदारांकडील बसचालक व वाहकांना मिळणारे वेतन यामध्ये खूप मोठी तफावत आहे. ती तातडीने दूर करणे खूप गरज आहे यासाठी कंत्राटदार यांनी नुसते फायद्याकडेच लक्ष न देता कर्मचाऱ्यांकडेही लक्ष दिले पाहिजे तरच आहे तो कामगार टिकून राहील नाहीतर मुंबईत बेस्ट बसला चालक मिळणे ही खूप कठीण गोष्ट असल्याचे आता दिसून येत आहे. आज बाजारात कुशल बस चालकांची संख्या कमी व मागणी जास्त आहे त्यामुळे जर आहे तो कर्मचारी टिकवला नाही तर मात्र कंत्राटदार नक्कीच संकटात सापडतील आणि यात भरडला जाईल तो बस प्रवासीच हे तितके खरे आहे.

## टेम्पोमधुन लोखंडी पट्ट्या पडून
# वाहन चालक जखमी

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

पुणे - सोलापूर महामार्गावर (दिनांक 6 एप्रिल ) दुपारी एक वाजण्याच्या सुमारास कदमवाकवस्ती हद्दीत हिंदुस्तान पेट्रोलियम टर्मिनलच्या समोर

लोणी काळभोर कडून पुण्याकडे चाललेल्या एम एच बारा एस एफ ९४३५ या टेम्पो मधून लोखंडी सळ्या व पट्ट्या अचानक ब्रेक दाबल्यामुळे टेम्पोच्या समोर पडुन वाहन चालक जखमी झाला आहे .

सुदैवाने समोर कुठलीही गाडी नसल्यामुळे मोठा अपघात टळला. पट्ट्या व सळया या महामार्गावर पडताना त्या टेम्पोच्या पुढील भागात पडल्यामुळे टेम्पोची काच फुटून आत मध्ये घुसल्या त्यामध्ये वाहन चालक जखमी झाला असुन अपघात होताच तेथून चाललेले पुरंदर - हवेलीचे आमदार



विजय शिवतारे यांचे कार्यकर्ते बबन शिंदे, आबा सोनवणे, गणेश राऊत (रा. बेकराईनगर फुरसुंगी ) यांनी ताबडतोब वाहन चालकाला बाहेर काढून रस्त्यावरील सळया एका बाजुला घेण्यास मदत केली.

लोणी काळभोर वाहतूक शाखेचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक देवेंद्र पवार यांनी ताबडतोब वाहतूक पोलिसांना पाठवून वाहतूक सुरळीत करण्यास व जखमीला रुग्णालयास नेण्यास सांगितले .अशा पद्धतीने धोकादायक स्टीलच्या साळ्या व लोखंडी रॉड पुणे - सोलापूर महामार्गाने सतत जात असतात त्याला पुणे शहर वाहतूक पोलिसांनी वेळीच कारवाई करण्याची गरज असल्याचे नागरिकांनी सांगितले.

## पुण्यात पुन्हा एकदा ठाण्याच्या रिक्षाची जोरदार चर्चा...

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर बदनामीकारक काव्य करणाऱ्या स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराला पुणेकराने चोख प्रत्युत्तर दिले आहे. कामराच्याच शैलीत काव्य करीत एकनाथ शिंदे यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करणारा फलक टिळक रस्त्यावर झळकला आहे. रिक्षा चालवताना एकनाथ शिंदे आणि मागे बसलेला 'कॉमन मॅन' असे व्यंगचित्र असलेला हा फलक सर्वांचेच लक्ष वेधून घेत आहे. 'बोलनेवाले बोलते रहें, वो काम ही करता जाए !' अशा शब्दांत शिंदे यांचा गौरव करण्यात आला आहे. युवा सामाजिक कार्यकर्ते वैभव वाघ यांनी हा फलक दुर्वांकुर डायनिंग हॉलसमोर लावला आहे. 'ठाणे की रिक्षा, चेहरे पे दाढी' गाण्यांच्या ओळी लिहीत 'शेर नजर वो आए' असा गौरवपूर्ण उल्लेख शिंदे यांचा करण्यात आला. हिंदुत्वाचा कैवारी, चिपळूणचा महापूर, इर्शाळवाडीची दुर्घटना यामध्ये शिंदे यांनी तत्परता दाखवत थेट घटनास्थळी जाऊन केलेले कार्य, आरोग्य कक्षाच्या माध्यमातून केलेले



कार्य यासह लाडकी बहीण योजना या काव्यातून मांडली आहे. काश्मीरच्या लाल चौकातील गणेशोत्सवात त्यांनी घेतलेला सक्रिय सहभाग यातून त्यांची कीर्ती ठाणेच नव्हे, तर पूर्ण देशभर असल्याचे दिसून येते, असे यातून सांगण्याचा प्रयत्न आहे. या संदर्भात वैभव वाघ म्हणाले, "एकनाथ शिंदे यांनी अवघ्या अडीच वर्षात मुख्यमंत्री केलेले लोकोपयोगी कार्य प्रेरणादायी आहे. सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून अधिकाधीक चांगल्या सोयीसुविधा, योजना देण्याचे काम त्यांनी केले.

## सिमेंटमध्ये दगड-मुरमाच्या भुकटीची भेसळ करणाऱ्यांना एक वर्षाची शिक्षा

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

एमआयडीसीमध्ये दगड-मुरमाची माती (भुकटी) मिसळून भेसळ केलेले सिमेंट नामांकित कंपनीच्या पोत्यात भरून विक्री करणाऱ्या दोन विक्रेत्यांना एक वर्षे साधा कारावास आणि प्रत्येकी पाच हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. येथील राजगुरुनगर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी जे. व्ही. म्हस्के यांनी ही शिक्षा सुनावली. जयकुमार बलवंत आगरवाल आणि कलवंत जयगोपाल आगरवाल (दोघेही रा. विद्यानगर, पुणे) अशी शिक्षा झालेल्या आरोपींची नावे आहेत. मरकळ व आळंदी (ता.खेड) च्या हद्दीत हा प्रकार सुरू होता. आळंदी (ता. खेड) पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडत असलेल्या भेसळीबाबत दि. १८ जून २०१४ रोजी अप्पर पोलिस अधीक्षक पुणे यांच्याकडून आळंदी पोलिसांना कारवाईचे आदेश देण्यात आले होते. पोलिसांनी मरकळ एमआयडीसीमध्ये असलेल्या साई सिमेंट कंपनीमध्ये छापा टाकला. त्या वेळी तेथे असलेल्या कामगारांची कसून चौकशी करण्यात आली. कंपनीतील सिमेंटबाबतचे साहित्य तपासून पाहण्यात आले. त्या वेळी पोलिसांना चेट्टीनाड ५३ ग्रेड सिमेंट या नामवंत कंपनीच्या सिमेंटमध्ये दगडाचे सँडक्रश (भुकटी) एकत्र केले जात असल्याचे दिसून आले. हे सिमेंट ओबर व मिलर मशिनमध्ये फिरवून त्याच्या एकत्रित मिश्रणातून तयार झालेले बनावट सिमेंट फसवणुकीच्या उद्देशाने साई सिमेंट इंडस्ट्रीजचे इंद्रायणी ५३ व अल्ट्रा शक्ती ५३ ग्रेड या नावाने नवीन सिमेंटच्या गोण्यांमध्ये भरून ते ग्राहकांना विक्री केले जात होते.

## व्यंकटसाई होंडाचा १४ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी येथील होंडा कंपनीचे अधिकृत वितरक व्यंकटसाई होंडाचा १४ व वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. ग्राहकांचा अविरत विश्वास तसेच उत्तम सेवांद्वारे व्यंकटसाईने हा १४ वर्षांचा टप्पा पार केला आहे. व्यंकटसाई होंडामध्ये सुशिक्षित कर्मचारी वर्ग असून नेहमीच ग्राहकांना योग्य मार्गदर्शन व सल्ला देऊन सेवा पुरविली जाते. व्यंकटसाई होंडामध्ये होंडाच्या सर्व गाड्या असून ग्राहकांना मेकॅनिकल द्वारे सविस्तर माहिती दिली जाते. वर्धापन दिनाच्या निमित्ताने शोरूमला फुग्यांची सजावट करून व केक कापून कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देत वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी विक्रम चाकणकर, सनी चाकणकर, राहुल राऊत, अंकुश भावकर, श्याम




शिरोळे, सागर, हेमंत, सुरेश दळवी, शरद भोसले, महेश कड्डू, चंद्रशेखर पोकळे, धरम सिंग आदी उपस्थित होते. व्यंकटसाई होंडाचे सर्वेसर्वा संतोष कदम म्हणाले की ग्राहकांचा विश्वास तसेच कर्मचाऱ्यांच्या सोबतीने हा १४ वर्षांचा प्रवास अधिक सुखकर आहे. ग्राहकांना नेहमीच उत्तमोत्तम सेवा प्रदान करण्यासाठी आम्ही तत्पर असतो. आगामी काळात आम्ही होंडाचे नवनवीन मॉडेल्स ग्राहकांसाठी सादर करणार आहोत.

# श्रीराम सेवक पवन बन्सल व परिवारातर्फे उपक्रमाचे आयोजन

## हजारो भाविकांच्या उपस्थितीत कोंढवा येथे श्रीराम नवमी व जन्मोत्सव साजरा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कोंढवा खुर्दच्या एनआयबीएम रोडवरील संकट मोचन महादेव मंदिर परिसरातील राम मंदिरातै रविवार ६ एप्रिल २०२५ रोजी श्रीराम नवमी व जन्मोत्सवाचा कार्यक्रम हजारो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. या निमित्ताने संपूर्ण मंदिर परिसर राममय झाल्याचे पहायला मिळाले. या उपक्रमासाठी श्रीराम सेवक पवन बन्सल व परिवारातर्फे पुढाकार घेण्यात आला, तसेच माजी नगरसेवक तानाजी लोणकर यांचे या सोहळ्याला मोठे सहकार्य लाभले. रामनवनमी निमित्ताने मंदिर परिसरात भव्य अशी सजावट करण्यात आली होती. दुपारी ठीक १२ वाजता रामजन्मोत्सव



सोहळ्याला सुरवात झाली. या वेळी हजारो भाविकांच्या उपस्थितीत प्रभू श्रीराम व सीता माता यांची मनोभावे पूजा व आरती करण्यात आली. तत्पूर्वी मंदिर परिसरात रामनाम व सीतानामाचा जप तसेच भजन कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला पवन बन्सल यांच्यासह पुणे अग्रवाल समाज के अध्यक्ष ईश्वर गोयल, भवन बन्सल, सुनीता बन्सल, अनिता रिषभ बन्सल, असीम बन्सल, जयभगवान गोयल, नरेंद्र गोयल, गुंजन नवल, संजय बन्सल, जीतेश बन्सल, संजय बन्सल, जीतेश अग्रवाल, शैलेश खंडेलवाल, योगेश जैन, पवन चमाडिया, सागर अग्रवाल रमेश अग्रवाल यांच्यासह मोठ्या संख्येने कोंढवा परिसर व शहरातील रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमासंदर्भात बोलताना पवन बन्सल म्हणाले की, आज या ठिकाणी राम नवमीनिमित्ताने हजारोंच्या संख्येत रामभक्तांनी येऊन प्रभू श्रीराम व माता सीतेचे दर्शन घेतले. या शिवाय या ठिकाणी रामायण मन का पाठ, महाअभिषेक, महाआरती करण्यात आली. त्यानंतर भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

बन्सल यांनी सांगितले की, ब्रदरहूडच्या वतीने राम नवमी निमित्ताने सोमवार ७ एप्रिल रोजी अल्पबचत भवन येथे संध्या काळी ५ वाजता भजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सुप्रसिद्ध गायक आदित्य गोयल आणि रितु पांचाल रामाची भजने सादर करणार आहेत. या भक्तिमयपूर्ण कार्यक्रमाला भाविकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# थोडक्यात



## भुवडवाडी,पकडेवाडी वरचा 'भार' हलका

- आ. शेखर निकम यांनी केले आंबव पोंक्षे येथील डीपीचे उद्घाटन

संगमेश्वर (आरंभ पर्व) : संगमेश्वर तालुक्यातील आंबव पोंक्षे येथे भुवडवाडी व पकडे वाडी साठी स्वतंत्र डीपी चालू करण्यात आला आहे.याचे उदघाटन चिपळूण संगमेश्वर चे आमदार शेखर निकम यांच्या हस्ते करण्यात आले. स्वतंत्र डीपी मिळावा यासाठी आमदार शेखर निकम यांनी महावितरणकडे विशेष प्रयत्न केले होते. पकडेवाडी ,भुवडवाडी मध्ये विद्युत भारामध्ये होणारा सतत चा चढउतार याचा येथील रहिवाशांना सारखा सामना करावा लागत असे. गणपती मध्ये तर येथील व्होल्टेज पूर्णपणे कमी होत असे.यास्तव येथील राहिवाशांची दोन्ही वाड्या ना स्वतंत्र डीपी मिळावा अशी महावितरण कडे अनेक वर्षांपासूनची मागणी होती. आमदार शेखर निकम हे, यामध्ये विशेष लक्ष घालून ती मागणी पूर्ण करून देण्यात यशस्वी झाले. मतदार संघातील प्रत्येक गावाला उन्नतीकडे नेण्यासाठी आपला कसोशीने नेहमीच प्रयत्न राहील असा आशावाद त्यांनी मनोगतावेळी व्यक्त केला. डीपीच्या उदघाटन प्रसंगी संगमेश्वर चिपळूण विधानसभा मतदारसंघाचे मुंबई संपर्क प्रमुख सुरेश घडशी,सरपंच शेखर उकार्डे, गौरव पोंक्षे,गावकर मोहन भुवड,संजय पकडे,सुरेश भुवड,दाजी भुवड,देवजी भायजे, राजेंद्र जाधव,दीपक शिगवण, मंगेश शिगवण,विजय पकडे, आदी सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गीतरामायण संगीत महोत्सवात श्रीरामाच्या नामाचा गजर

पुणे (आरंभ पर्व) : आधुनिक महाराष्ट्राचे वाल्मीकी ग. दि. माडगूळकर आणि ज्येष्ठ संगीतकार-गायक सुधीर फडके यांच्या अलौकिक प्रतिभेचा मिलाफ असलेल्या गीतरामायण संगीत महोत्सवाचे आयोजन स्व. विठ्ठलराव तुपे नाट्यगृह हडपसर करण्यात आले होते. सदरील गीत रामायण महोत्सव दोन दिवस या ठिकाणी मोठ्या उत्साहात पार पडला. या महोत्सवात श्रीराम व रामायणावरील आधारित गीते तसेच रामायणावर निरूपण करण्यात आले. सदरील महोत्सवाला रामभक्तांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. गीत रामायणातून प्रभू श्रीरामांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. १ एप्रिल १९५५ रोजी आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून गीतरामायणातील पहिल्या गीताचे प्रसारण झाले, त्याला ७० वर्षे झाली. याचेच औचित्य साधून हा महोत्सव पार पडणार आहे. शब्दप्रभू ग. दि. माडगूळकर आणि स्वराधीश सुधीर फडके ह्यांची सत्तरीकडे वाटचाल करणारी अजरामर कलाकृती गीतरामायण सर्वोत्कर्ष पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट सादर करीत आहे. महोत्सवाचे निरुपण आणि गायन आनंद माडगूळकर यांनी केले तर गायक हेमंत वाळुंजकर, प्रज्ञा देशपांडे, मीनल पोक्षे आणि राजेश दातार यांनी केले. स्वये श्रीरामप्रभु, दशरथाचा घे हे, राम जन्मला ग, सखे जेष्ठ तुझा पुत्र, रामा चरण तुझे, स्वयंवर झाले सीतेचे, मोडू नका वाचनास नाथ, नकोस नौके परत, आई शत्रू नाही अशी अनेक गीते सादर करण्यात आली. दैव ज्यात तात गेले, पराधीन आहे जगती ही गाणी गायक राजेश दातार यांनी गायली. सदरील गीतांना रसिकांनी उदंड प्रतिसाद दिला. ओंकार पाटणकर (की-बोर्ड), तुषार दीक्षित (हार्मोनियम), राजेंद्र हसबनिस (तबला), अवधूत (साईड रीदम) या वादांनी गीतरामायण संगीत महोत्सवाला मोलाची वादनाची साथ दिली.

## लोवले पडयेवाडी येथे कार्यक्रम संपन्न

संगमेश्वर(आरंभ पर्व) : संगमेश्वर येथील लोवले - पडयेवाडी येथे असलेल्या श्री स्वामी समर्थ मठाच्या २४व्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दोन दिवसीय चाललेल्या या कार्यक्रमात स्वामीभक्तांनी दर्शनासह पालखी सोहळ्यापासून महाप्रसादापर्यंत लाभ घेतला. संगमेश्वर तालुक्यातील लोवले - पडयेवाडी येथील प्रसिद्ध श्री स्वामी समर्थ मठाचा २४ वा वर्धापन दिन नुकताच साजरा करण्यात आला. सोमवार (दि. ३१) रोजी श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकटदिन होता. यानिमित्त पंचक्रोशीतील भाविकांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहत श्री स्वामींचे दर्शन घेतले. यावेळी मठाच्या वर्धापन दिनानिमित्त स्वामी समर्थ सेवा मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. पहिल्या दिवशी गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर रविवार (दि. ३०) रोजी दुपारी नितीन खातू यांच्या निवासस्थानापासून संगमेश्वर बाजारपेठ मार्गे स्वामींच्या मठापर्यंत श्री स्वामींच्या पादुकांची मिरवणूक काढण्यात आली. दुसऱ्या दिवशी सकाळी स्वामींच्या पादुकांचे पूजन करून श्री सत्य नारायणाची पूजा घालण्यात आली. पूजा झाल्यावर पालखी प्रदक्षिणा घातल्यानंतर आरती करण्यात आली.

## थोडक्यात



### चाचणी करण्याच्या नावाखाली लाखो लिटर पाण्याची नासाडी

● राजगुरुनगर शहरातील प्रकार

राजगुरुनगर (आरंभ पर्व) : खेड तालुक्याच्या काही भागात भर उन्हाळ्यात पाण्यासाठी नागरिक त्रस्त असताना, राजगुरुनगर नगरपरिषदेकडून शहराच्या अनेक भागात नव्याने करण्यात आलेल्या योजनेच्या जलवाहिनी तसेच नवीन नळपाणीपुरवठा योजनेची चाचणी करण्याच्या नावाखाली लाखो लिटर पाणी रस्त्यांवर सोडण्यात येत असल्याचे शहरात गुरुवारी (दि. ३) नागरिकांना पाहायला मिळाले. काही तास सुरू असलेल्या या पाण्यामुळे रस्त्यांवर भर उन्हात तळ्याप्रमाणे पाणी साचले होते. रस्त्यावर साचलेले पाणी लगतच्या दुकान, घरांमध्ये देखील जात होते. तसेच या प्रकारामुळे खोदलेल्या रस्त्यांवर पाणी साचून पावसाळा सदृष्य परिस्थिती निर्माण झाली होती. यामुळे नागरिकांना रस्त्यावरून चालताना पाण्यातून वाट काढावी लागुन मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. परिणामी, नगरपरिषदेच्या या बेजबाबदार कारभारामुळे एकीकडे पाण्याची नासाडी होत असताना, दुसरीकडे नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. शहराला चासकमान धरणाजवळुन पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली आहे.गेली दहा वर्षे नागरिकांना या पाण्याची प्रतीक्षा आहे. गेले काही वर्षांपासून हे काम अंतिम टप्प्यात असल्याचे सांगुन नगरपरिषद वेगवेगळ्या भागात जलवाहिनी व नळजोडमध्ये पाणी सोडुन चाचणी केली जात आहे. मात्र चाचणीच्या नावाखाली पाणी वाया घालवण्याचा हा प्रकार नेमका किती दिवस चालणार ? हा नगरपरिषदेच्या बाबतीत संशोधनाचा विषय झाला आहे. ही चाचणी सुरू असताना शहरात रस्त्यांचीही नवीन कामे सुरू आहेत. तर जलवाहिनी मध्ये दोष आढळल्यास नव्याने तयार झालेल्या सिमेंट रस्त्यांची पुन्हा ब्रेकर लाऊन खोदाई करण्यात येत आहे. खोदलेले रस्ते आणि त्यावर साचलेले पाणी असे चित्र रोज वेगवेगळ्या ठिकाणी दिसत आहे. यामुळे वाहतूकही विस्कळीत होत असून, नागरीकांच्या दैनंदिन कामकाजात अडथळे येत आहेत.




### पुण्यात "राम-सीता स्वयंवर" आणि "सखी गीतरामायण" चा भव्य सोहळा!

पुणे (आरंभ पर्व) : ग्रॅव्हिटी ग्रुपचे अध्यक्ष डॉ. मिहीर कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली राम नवमीच्या पूर्वसंध्येला "सखी गीतरामायण आणि राम-सीता स्वयंवर" या भव्य आणि ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन पुण्यातील गणेश कला क्रीडा मंच, स्वारगेट येथे अत्यंत भक्ती-भावात पार पडले. या आध्यात्मिक कार्यक्रमात हजारो रामभक्तांनी सहभाग घेतला आणि भक्तीमय अनुभवाचा लाभ घेतला. या कार्यक्रमात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले आणि त्यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. त्यांच्यासोबत खासदार मेधा कुलकर्णी, आमदार हेमंत रासणे, आमदार भीमराव तापकीर यांच्या सोबत अनेक मान्यवर व सांस्कृतिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्वांनीही सहभाग नोंदवला. मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात सांगितले, की "भगवान श्रीराम हे केवळ धर्म आणि मर्यादेचे प्रतीक नसून, भारताच्या सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांचे मूळ आहेत. आज या अद्वितीय कार्यक्रमाला उपस्थित राहून मी स्वतःला भाग्यवान समजतो. गीतरामायणाची सादरीकरण आणि राम-सीता स्वयंवराचे नाट्य सादरीकरण इतके भव्य आणि सुंदर झाले की प्रत्येक प्रेक्षक भावविव्हल झाला. ही एक अशी सांस्कृतिक गोष्ट आहे जी आपल्या परंपरेला जिवंत ठेवते, आणि यासाठी मी ग्रॅव्हिटी ग्रुपचे डॉ. मिहीर कुलकर्णी यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो."

# लोकप्रतिनिधींनी पदाचा उपयोग सर्वसामान्यांच्या समस्या सोडवण्यासाठी करावा

### प्रा. राम शिंदे यांचे प्रतिपादन; आमदार योगेश टिळेकर यांच्या पुढाकाराने विधान परिषदेचे सभापती झाल्याबद्दल शिंदे यांचा नागरी सत्कार




पुणे (दै. आरंभ पर्व)

"आपल्या प्रश्नांची सोडवणूक होईल, हिताचे निर्णय होतील, या आशेने सामान्य नागरिक विधिमंडळाकडे पाहत असतो. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी आपल्या पदाचा उपयोग सर्वसामान्य माणसाच्या समस्या सोडविण्यासाठी, त्यांच्या आयुष्यात बदल घडविण्यासाठी करायला हवा," असे प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले. हा घरचा, गावकऱ्यांनी केलेला सत्कार भावस्पर्शी असल्याची भावनाही त्यांनी व्यक्त केली.

विधान परिषदेच्या सभापतिपदी निवड झाल्याबद्दल प्रा. राम शिंदे यांचा नागरी सत्कार करण्यात आला. विधान परिषद आमदार योगेशअण्णा टिळेकर यांच्या पुढाकारातून कोंढवा बु. ग्रामस्थ, कर्जत-जामखेड, करमाळा रहिवाशी संघाच्या वतीने या सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. इस्कॉन मंदिर सभागृहात आयोजित सोहळ्यात योगेशअण्णा टिळेकर, माजी नगरसेविका रंजना टिळेकर, मनीषा कदम, वृषाली कामठे, नगरसेवक अनिल येवले, सतीश मरकड, तुषार कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनय पाटणकर, इस्कॉन मंदिराचे संजय भोसले, स्थानिक पदाधिकारी विरशेन जगताप आदी उपस्थित होते. प्रा. राम शिंदे म्हणाले, "निवडणुकीत पराभूत होऊनही पक्षाने या सर्वोच्च पदावर काम करण्याची संधी दिली. हा मोठा बहुमान आहे. सभागृह चालवताना लोकांचे प्रश्न मांडत असलेल्या सदस्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतो. माझ्यासह योगेश टिळेकर हेही विधानसभेला पराभूत झाले, परंतु आदरणीय देवेंद्र फडणवीस व पक्ष नेतृत्वाने आम्हाला जनतेसाठी काम करण्याची संधी दिली. मनात स्वच्छ, निर्मळ आणि लोकांप्रती संवेदना जागृत असतील, तर न्याय मिळतोच.""आम्हाला दोघांनाही कट कारस्थान करून पराभूत केले. मात्र मागे न सरकण्याची आमची भूमिका आहे. लोकांमध्ये राहणारा माणूस असल्याने पक्षाने आमचा सन्मान ठेवला. योगेश टिळेकर यांनी सभागृहात पोटतिडकीने आपल्या भागातील, तसेच राज्यातील जनतेच्या हिताचे प्रश्न, लक्षवेधी मांडल्या. त्यांच्या पाठपुराव्यामुळे लवकरच दालनात बैठका लावल्या असून, १५ ते २० दिवसात समान पाणीपुरवठा आणि कात्रज-कोंढवा रस्त्याचा प्रश्न सुटेल. माथाडी कामगारांवर अन्याय होणार नाही. विधेयकात काही तरतुदी बदलाव्या लागल्या, तर चर्चा करून त्यात सुधारणा केली जाईल."

योगेशअण्णा टिळेकर म्हणाले, सामान्य कुटुंबातील आपला माणूस विधान परिषदेचा सभापती झाला, ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. तुम्हा सर्वांची सेवा करताना तुमचे प्रश्न जोरकसपणे मांडू शकतो, कारण तिथे शिंदे साहेब आता सभापती म्हणून बसले आहेत. त्यांच्या कार्यातून नेहमीच शिकत आलो आहे. अहमदनगरचे अहिल्यानगर होण्यात त्यांचे योगदान मोठे आहे. राजमाता अहिल्याबाई यांचा आदर्श घेऊन शिंदे साहेब काम करत आहेत. चोंडीचा विकास करण्यात त्यांनी घेतलेला पुढाकार महत्त्वाचा आहे. शिंदे, होळकर परिवाराचा वारसा यशस्वीपणे चालवत आहेत. संघटनेने, नेतृत्वाने त्यांच्यावर विश्वास टाकला. आप्तस्वकीयांचा हा सत्कार आपल्याला ऊर्जा देणारा ठरेल. देवेंद्र फडणवीस आणि प्रा. राम शिंदे यांची जोडी महाराष्ट्राला दिशा देईल. आपल्या पाठिंब्याने कात्रज, कोंढवा भागातील प्रश्न लवकरच मार्गी लागतील, असा विश्वास वाटतो."

संजय भोसले, भूषण नहाटा यांनी मनोगते व्यक्त केली. गोकुळ बरकडे यांनी प्रास्ताविक केले. अमर हजारे यांनी सूत्रसंचालन केले. वीरशेन जगताप यांनी आभार मानले. मानपत्र वाचन अश्विनी कामठे यांनी केले.

## संस्कारवाणी फाउंडेशनतर्फे सॅनिटरी पॅड डिस्पोजल मशीन



पुणे (दै. आरंभ पर्व)


विद्यार्थी साहाय्यक समितीच्या मुलींच्या नवीन वसतिगृहासाठी संस्कारवाणी फाउंडेशनच्या वतीने दोन सॅनिटरी पॅड डिस्पोजल मशीन देणगी स्वरूपात भेट देण्यात आल्या. संस्कारवाणी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विवेक शिरोडे, उपाध्यक्ष प्रवीण कोतकर, खजिनदार राजेंद्र तातार, विश्वस्त दिलीप येवले, नितीन दहिवलेकर, उमेश कोठावदे, सुनील शिनकर यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी समितीच्या वसतिगृहात भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी विद्यार्थी साहाय्यक समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, मुख्य विकास अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, कार्यकर्ते दिनकर वैद्य आदी उपस्थित होते. वसतिगृहाच्या पर्यवेक्षिका नम्रता गजरे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

## बॉबी देओल अभिनित 'आश्रम'ने तोडले सर्व स्टिरिओटाइप्स

पुणे (दै. आरंभ पर्व)

अॅमेझॉन एमएक्स प्लेयरची ब्लॉकबस्टर सीरीज आश्रमने परत एकदा नवा मापदंड प्रस्थापित केला असून भारतभरात 250 दशलक्ष प्रेक्षक मिळवले आहेत. नवीन आश्रम सीझन 3, पार्ट 2 ने ऑरमॅक्स मीडियाच्या मोस्ट- वॉच्ड स्ट्रीमिंग ओरिजनल्समध्ये सलग चौथ्या आठवड्यात आघाडीचे स्थान मिळवत भारतातल्या सर्वात लोकप्रिय ओटीटी फ्रँचाईझीचे स्थान बळकट केले आहे.




प्रेक्षकांबद्दलचे गैरसमज दूर, वेबसीरीज पोहोचली सर्वांपर्यंत

- अॅमेझॉनच्या शॉपिंग प्रोफाइलमध्ये 77 टक्के प्रेक्षक टेकसॅव्ही आणि 64 टक्के फॅशन- फॉर्वर्ड असल्याचे दिसून आले आहे. यावरून चाहता वर्ग ट्रेंडबद्दल जागरूक असल्याचे अधोरेखित झाले आहे.
- गुन्हेगारीवर आधारित सीरीज फक्त पुरुष प्रेक्षकांना आवडतात हा गैरसमज आश्रमने खोडून काढला असून या सीरीजच्या प्रेक्षकांमध्ये स्त्रियांचे प्रमाण 20 टक्के आहे.
- या सीरीजला वेगवेगळ्या वयोगटातल्या प्रेक्षकांचा प्रतिसाद लाभत असून त्यात यंग अडल्ट्सपासून 25+ वर्ष वयोगटातल्या प्रेक्षकांचा समावेश आहे.
- आश्रम सीरीज पॅन भारतातील पहिल्या व दुसऱ्या श्रेणीच्या शहरांतील प्रेक्षकांना पसंत पडली आहे तसेच तिसऱ्या श्रेणीतल्या प्रेक्षकांचा प्रतिसादही मिळत आहे. हिंदीचे वर्चस्व असले, तरी या सीरीजच्या बंगाली, तमिळ आणि तेलुगुमध्ये डब झालेल्या आवृत्तीलाही प्रेक्षकवर्ग मिळत आहे.

अभूतपूर्व चर्चा आणि नाविन्यपूर्ण मार्केटिंग

- या सीरीजने विविध प्रायोजक मिळवले असून प्रेझेंटिंग स्पॉन्सर विमल, को- पॉवर्ड बाय लाहोरी झीरा, लक्स नायट्रो आहेत आणि खास पार्टनर्समध्ये केईआय वायर्स आणि केबल्स, केनस्टार व झंडू फास्ट रिलीफ यांचा समावेश आहे.
- युट्युबवर प्रदर्शित झालेले ट्रेलर युट्यूबवर 23 दिवस ट्रेंडिंग होते व त्याला तब्बल 24 दशलक्ष व्ह्यूज मिळाले आहेत.
- 360 मार्केटिंग प्लॅन टीव्ही, डिजिटल, आउटडोअर आणि सोशल मीडियातून जारी करण्यात आले असून त्याने देशभरात चर्चा घडवून आणली.
- भारतीय क्रिकेट खेळाडू युजवेंद्र चहल यांच्यासोबत करण्यात आलेल्या सहकार्याच्या मदतीने बाबा निराला यांनी त्यांची 'ओपनर' होण्याची इच्छा 'पूर्ण' करत जबरदस्त प्रेक्षकवर्ग मिळवून दिला. 6.3 दशलक्ष व्ह्यूज आणि 850के एंगेजमेंट मिळाले.

या भरघोस प्रतिसादाविषयी बॉबी देओल म्हणाले, 'आश्रमने माझ्या प्रवासाला नवं वळण दिलं.

# सुरक्षा, सक्षमीकरण व आत्मनिर्भरतेसाठी धावल्या हजारो 'हिरकणी'!

### *साई जनसेवा प्रतिष्ठानतर्फे 'हिरकणी रन', वुमेन्स हाफ मॅरेथॉनचे आयोजन; अभिनेत्री सोनाली कुलकर्णीचा सहभाग*

● रविना गायकवाड, निकिता गोविंद, ज्योती गवते, सपना रघुवंशी, पूजा ओसवाल, सायली दळवी प्रथम स्थानी




पुणे (दै. आरंभ पर्व)

महिला सुरक्षित, निर्भय, सक्षम व आत्मनिर्भर व्हावी, त्यांच्यामध्ये फिटनेसचे महत्व वाढावे, या उद्देशाने हजारो 'हिरकणी' रविवारी पुण्याच्या रस्त्यावर धावल्या. अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिच्यासह 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' चित्रपटाच्या टीमने महिलांना प्रोत्साहन दिले. 'आम्ही सुरक्षित व सक्षम आहोत', असा संदेश महिलांनी यावेळी दिला. साई जनसेवा प्रतिष्ठानच्या वतीने पहिल्या 'हिरकणी रन', वुमेन्स हाफ मॅरेथॉनचे आयोजन केले होते. पुण्यासह राज्यातील विविध शहरातून व गावांतून १२०० पेक्षा अधिक महिलांनी यात सहभाग घेतला. बाबुराव सणस मैदान, सारसबागपासून मॅरेथॉनला सुरुवात झाली. तीन, पाच, दहा आणि २१ किलोमीटर अशा चार प्रकारात झालेल्या मॅरेथॉनला उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला.

यावेळी अभिनेत्री सोनाली कुलकर्णीसह 'मुक्ताई'चे दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर, अभिनेता अजय पुरस्कार, तेजस बर्वे, अभिनेत्री नेहा नाईक, साई जनसेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष व संयोजक सुरज लोखंडे, प्रतिष्ठानच्या अध्यक्षा गीता मोहोरकर, निशा पाचंगे, स्मिता भिसे, विपुल शर्मा आदी उपस्थित होते.

सोनाली कुलकर्णी म्हणाली, "राज्यभरातून धावण्यासाठी आलेल्या 'हिरकणीं'चा उत्साह वाखाणण्याजोगा आहे. मुली, महिलांनी एकमेकींना सशक्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपले स्वास्थ्य चांगले व तंदुरुस्त असायला हवे. त्यासाठी व्यायाम, डायट याचा समतोल राखला पाहिजे. आपल्या महाराष्ट्रातील अनेक कर्तृत्ववान महिलांकडून प्रेरणा घ्यावी. शारीरिक, मानसिक व आर्थिक सशक्त झालो, तर आपण देशासाठी, समाजासाठी चांगले योगदान देऊ शकतो."


सुरज लोखंडे म्हणाले, "हजारो महिलांनी मॅरेथॉनमध्ये सहभागी होत पुण्यातील महिला सुरक्षित व सक्षम असल्याचे दाखवून दिले. या मॅरेथॉनमधुन उभा राहणाऱ्या निधीचा विनियोग अनाथ व दिव्यांग मुलांच्या संस्थांसाठी करण्यात येणार आहे. साई जनसेवा प्रतिष्ठान नेहमीच जनतेच्या हिताचे उपक्रम राबवत असते. 'हिरकणी रन' ही मॅरेथॉन यापुढे दरवर्षी घेतली जाणार आहे."

अजय पुरकर, दिग्पाल लांजेकर यांची महिलांना प्रोत्साहित केले. यावेळी झालेल्या झुंबा नृत्याने उपस्थित महिलांमध्ये उत्साह संचारला होता. सहभागी सर्व धावपटूंना प्रमाणपत्र, मेडल, टीशर्ट व नाश्ता देण्यात आला. विजेत्यांना रोख पारितोषिके देण्यात आली. सणस मैदान, दांडेकर पूल, सिंहगड रोड, राजाराम पूल, संतोष हॉल ते सणस मैदान असा मॅरेथॉनचा मार्ग होता.

# राजगुरुनगर सहकारी बँकेला २५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा

### व्यवसायात ७०० कोटी रुपयांची वाढ - अध्यक्ष दिनेश ओसवाल

**किरण खुडे**



राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)

येथील राजगुरुनगर सहकारी बँकेने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात भरीव कामगिरी नोंदवत विक्रमी २५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा कमावला आहे. या आर्थिक वर्षात तब्बल ४०५ कोटी रुपयांचा व्यवसाय करत बँकेने जिल्ह्यातल्या नागरी सहकारी बँकांमध्ये अव्वल क्रमांक पटकावला आहे. अशी माहीती बँकेचे अध्यक्ष दिनेश ओसवाल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी बँकेचे उपाध्यक्ष अविनाश कहाणे, जेष्ठ संचालक किरण आहेर, राजेंद्र सांडभोर, राजेंद्र वाळुंज, दत्ता भेगडे, विजया शिंदे, सागर पाटोळे, विजय डोळस, अश्विनी पाचारणे, रामदास धनवटे, विनायक घुमटकर, गौतम कोतवाल, समीर आहेर, सचिन मांजरे, मुख्याधिकारी शांताराम वाकचौरे, अधिकारी संजय ससाणे, अमृत टाकळकर आदी यावेळी उपस्थित होते.

राजगुरुनगर सहकारी बँकेने आपल्या ग्राहकांना आणि कर्जधारकांना अनेक नावीन्यपूर्ण सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. गेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांना दिलेले आश्वासनाची पूर्तता म्हणुन कर्जधारकांना पुर्वीच्या दोन लाखांऐवजी या आर्थिक वर्षापासून कर्जदार सभासदांना ऐच्छिक स्वरूपात चार लाखांचा अपघाती विमा दिला आहे. विविध प्रकारच्या ४०० व्यवसायांना २५ ते ३५ टक्के अनुदानित कर्ज पुरवठा करण्यात येणार आहे. याशिवाय, मोबाईल बँकिंग, एटीएम आणि इतर डिजिटल बँकिंग सेवांच्या वापरातही बँकेने आघाडी घेतली आहे असेही अध्यक्ष दिनेश ओसवाल यांनी सांगितले.

बँकेची ही प्रगती म्हणजे ग्राहकांचा विश्वास आणि कर्मचाऱ्यांच्या मेहनतीचे फळ आहे. झपाट्याने विकसित होत असलेली हा बँक विश्वासार्हतेच्या नव्या राजमार्गावरून यशस्वी वाटचाल करत आहे. भविष्यातही ग्राहककेंद्रित सेवा आणि नावीन्यपूर्ण योजना राबवण्याचा बँकेचा मानस आहे असेही ओसवाल यांनी सांगितले.

अयोध्येत श्रीराम मंदिर पुर्ण होऊन प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्या प्रित्यर्थ बँकेत नव्याने 'श्रीराम आवर्त ठेव योजना' सुरू केली होती. या पार्श्वभूमीवर बँकेत नव्याने साडेचार हजार खाती उघडण्यात आली. असेही ओसवाल यांनी सांगितले.

यावेळी उपस्थितांचे आभार उपाध्यक्ष अविनाश कहाणे यांनी मानले.

**७०० कोटी रुपयांनी व्यवसायवाढ**

**बँकेचा एकूण व्यवसाय २९०० कोटी इतका झाला आहे. ग्रॉस एनपीए ६.२७ टक्के आहे. आपल्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात ७०० कोटी रुपयांनी व्यवसाय वाढ झाली. तसेच ग्रॉस N.P.A १५.५ टक्के ने कमी होऊन ६.२७ टक्का झाला. खेड तालुक्यातील चाकण एम आय डी सी भागात वाढत असलेल्या व्यावसाईक भागातील भांबोली बँक शाखेचे लवकरच उद्‌घाटन करण्यात येणार आहे. असेही यावेळी अध्यक्ष ओसवाल यांनी सांगितले.**















दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.